—: **प्रेस नोट** :—　　　　　　　　दिनांक : ३०/०५/२०१९

यातील लोकसेवकांनी फिर्यादी यांचेकडे कायदेशीर सरकारी काम करुन देण्याकरीता प्रत्येकी रु. २,००,०००/— प्रमाणे रु. ६,००,०००/— लाचेच्या रक्कमेची मागणी करुन तडजोडीअंती रु. ४,५०,०००/— लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले तसेच लोकसेवक यांच्या कार्यालयातील इसमाने लाचेची रक्कम स्विकारणे सुलभ जावे म्हणून सहाय्य केले म्हणुन मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन गुन्हा दाखल.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | १९/२०१९ |
| कलम | कलम ७, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८<br>(सुधारीत अधिनियम २०१८) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १) श्री. महिशी, कार्यकारी अभियंता २) श्री. सुर्यवंशी, दुय्यम अभियंता, ३) श्री. दिघावकर, उप अभियंता, सर्व नेमणुक के—पुर्व विभाग, झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरण प्रशासकिय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पुर्व), मुंबई.<br>४) इसम नामे श्री. पाटकर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ६,००,०००/— |
| तडजोडीअंती स्विकारण्याचे मान्य केलेली रक्कम | रु. ४,५०,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी यांना इंटरीयर डिझाईन व रिन्युव्हेशनचे कामासंदर्भातील परवानगी देण्यासाठी यातील लोकसेवकांनी तक्रारदार यांचेकडे कायदेशीर सरकारी काम करुन देण्याकरीता प्रत्येकी रु. २,००,०००/— प्रमाणे एकुण रु. ६,००,०००/— लाचेची मागणी केली.<br>फिर्यादी यांची लोकसेवकांस लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग या कार्यालयात दिलेल्या तक्रारीवरुन पडताळणी करण्यात आली. पडताळणी कारवाई दरम्यान यातील लोकसेवकांनी फिर्यादी यांचेकडे तडजोडीअंती रु. ४,५०,०००/— रक्कमेच्या लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे कबुल केले तसेच सदर लाचेची रक्कम स्विकारणे सुलभ जावे म्हणून लोकसेवक क्र. १ यांच्या कार्यालयात काम करणारा इसम पाटकर यांने सहाय्य केले म्हणुन त्यांचेविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाकडे संपर्क साधावा.**

**संपर्क** : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई— ३०.
संकेतस्थळ — **acbmaharashtra.gov.in**
ईमेल : **(1) acbwebmail@mahapolice.gov.in, (2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
ऑनलाईन तक्रार अॅप्लीकेशन - **www.acbmaharashtra.net**
टोल फ्री क्र. १०६४
दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,
व्हॉट्स अॅप क्रमांक —९९३०९९७७००

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

30/5/19

( दिनकर पिंगळे )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग.

Scanned by CamScanner